गुरुवार दि. २४ सप्टेंबर २०२६ ● जालना ● वर्ष ८ वे ● अंक २४ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता. जाफ्राबाद जि. जालना (मेन रोड)
एका छताखाली आरोग्य सेवा
डॉ. आनंद मान्ने Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com
# युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# ‘व्यक्तिगत टीका नको; समाजाच्या प्रश्नांवर विधायक भूमिका घ्या

## अन्यथा शिवसेना स्टाईलने उत्तर देऊ’ आमदार अर्जुनराव खोतकर यांचा मनोज जरांगे पाटील यांना इशारा; ‘संयम ही आमची दुर्बलता समजू नका’

**जालना । प्रतिनिधी**

“टिका करताना व्यक्तिगत पातळीवर जाऊ नका. समाजाच्या प्रश्नांसाठी विधायक भूमिका घ्या; आम्ही तुमच्या सोबत राहू. मात्र, आमच्या पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांवर व्यक्तिगत टीका आणि अवमानकारक वक्तव्ये सुरू राहिली तर शिवसेना स्टाईलने उत्तर दिले जाईल. आमचा संयम ही आमची दुर्बलता समजू नका,” असा स्पष्ट इशारा शिवसेना नेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी मनोज जरांगे पाटील यांना दिला.

जालना येथे आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते. यावेळी अभिमन्यू खोतकर, भास्कर अंबेकर, पंडित भुतेकर, भाऊसाहेब घुगे, विष्णू पाचफुले, भास्कर मगरे आदी उपस्थित होते. मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून सुरू असलेल्या राजकीय आणि सामाजिक चर्चेच्या पार्श्वभूमीवर खोतकर यांच्या या वक्तव्यामुळे जालन्यातील राजकीय वातावरणात नव्या चर्चेला सुरुवात झाली आहे.

**‘एकनाथ शिंदेंना संपवण्याची भाषा निषेधार्ह’**

मनोज जरांगे पाटील यांच्याकडून शिवसेना प्रमुख तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याबाबत सुरू असलेल्या वक्तव्यांचा संदर्भ देत खोतकर यांनी नाराजी व्यक्त केली. “सध्या सामाजिक ध्रुवीकरण सुरू आहे. अशा परिस्थितीत एकनाथ शिंदे यांच्याबद्दल अशा प्रकारची वक्तव्ये होणे क्लेषदायक आहे. मराठा समाजाची परिस्थिती वेगळ्या वळणावर आहे. समाजाचे नेतृत्व करणारे अनेक ज्येष्ठ नेते आता आपल्यात नाहीत. त्यामुळे समाज एकनाथ शिंदे यांच्याकडे आशेने पाहत आहे. अशा वेळी त्यांना संपवण्याची भाषा करणे निषेधार्ह आहे,” असे खोतकर म्हणाले. त्यांच्या या विधानातून मराठा समाजातील प्रश्न आणि शिंदे यांच्या नेतृत्वाभोवती सुरू असलेल्या राजकीय चर्चेला त्यांनी अधोरेखित केले.



**‘मराठा आरक्षणाच्या प्रश्नाची दखल शिंदेंनी घेतली’**

एकनाथ शिंदे यांच्या कार्यकाळात मराठा आरक्षणासंदर्भात घेण्यात आलेल्या निर्णयांचा दाखला देत खोतकर यांनी शिंदे सरकारच्या भूमिकेचे समर्थन केले.

न्यायमूर्ती संदीप शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून जुन्या नोंदींचा शोध घेण्याचे काम करण्यात आले. उपलब्ध नोंदींच्या आधारे पात्र व्यक्तींना कुणबी प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया सुरू झाली, असा दावा खोतकर यांनी केला. शिंदे समितीच्या कामानंतर मोठ्या प्रमाणावर नोंदी सापडल्याचा उल्लेखही त्यांनी केला. मराठवाड्यातील उपलब्ध ऐतिहासिक कागदपत्रांच्या आधारे मराठा-कुणबी व कुणबी-मराठा नोंदी तपासण्याची प्रक्रिया सरकारने सुरू केली होती.

खोतकर म्हणाले की, एसईबीसी प्रवर्गातून १० टक्के आरक्षण, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ, सारथी संस्था, पंजाबराव देशमुख निर्वाह भत्ता आणि राजर्षी शाहू महाराज शिष्यवृत्ती यांसारख्या योजनांचा मराठा समाजातील युवकांना लाभ मिळत आहे. मराठा आरक्षणाच्या आंदोलनादरम्यान आत्महत्या केलेल्या व्यक्तींच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत आणि कुटुंबातील एका व्यक्तीला नोकरी देण्याच्या निर्णयाचाही त्यांनी उल्लेख केला.

**‘शिंदे समितीच्या कामाचे श्रेय नाकारता येणार नाही’**

“मराठा समाजासाठी घेतलेल्या निर्णयांमध्ये एकनाथ शिंदे यांच्या सरकारची भूमिका होती. शिंदे समितीला मुदतवाढ देण्यात आली. समितीच्या माध्यमातून नोंदी शोधण्याचे काम झाले. त्यानंतर पात्र व्यक्तींना प्रमाणपत्रे मिळाली. त्यामुळे या प्रक्रियेतील योगदान विसरता येणार नाही,” असे खोतकर यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, उपलब्ध सार्वजनिक आकडेवारीवरील वृत्तांनुसार, शिंदे समितीच्या प्रक्रियेनंतर मराठवाड्यासह राज्यात कुणबी व मराठा-कुणबी प्रमाणपत्रांच्या संख्येत मोठी वाढ झाल्याचे नमूद करण्यात आले आहे. मात्र, या प्रमाणपत्रांची प्रक्रिया पात्रता आणि उपलब्ध ऐतिहासिक नोंदींच्या आधारे करण्यात येते, हेही या चर्चेत *(पान २ वर)*

## नवीन मोंढ्यात किराणा दुकानाचे पत्रे कापून चोरी; चंदनझिरा पोलिसांनी चोरट्याला पकडले

*छताचा पत्रा कापून दुकानात प्रवेश; रोख १४ हजारांसह बेसनची बॅग लंपास, चोरीचा मुद्देमाल जप्त*

**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील नवीन मोंढा भागातील होलसेल किराणा दुकानाच्या छताचे पत्रे कापून दुकानातील रोख रक्कम चोरी करणाऱ्या संशयित आरोपीस चंदनझिरा पोलिसांनी अवघ्या दोन दिवसांत ताब्यात घेतले. पोलिसांनी केलेल्या चौकशीत



आरोपीने चोरीची कबुली दिली असून, त्याच्याकडून दिल्याची माहिती पोलिसांनी चोरीस *(पान २ वर)*

## पावसाच्या खंडामुळे जालना तालुक्यातील खरीप पिके संकटात : भास्कर दानवे

शेतकऱ्यांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी; पंचनामे व मदतीसाठी शासनाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन

**जालना - प्रतिनिधी**

पावसाने दीर्घकाळ दडी मारल्याने जालना तालुक्यातील खरीप हंगामावर संकट ओढवले आहे. पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली असून अनेक भागांत सोयाबीनसह कापूस, तूर, मूग आदी पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर भाजपा नेते भास्कर आबा दानवे यांनी घानेवाडी येथे शेतकऱ्यांच्या शेतावर जाऊन पिकांच्या सद्यस्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली.



यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे निर्माण झालेल्या अडचणी जाणून घेतल्या. अनेक शेतकऱ्यांनी पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली असून काही ठिकाणी पिके वाळण्याच्या स्थितीत असल्याची माहिती दिली. भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, शेतकऱ्यांवर आलेल्या या संकटाकडे प्रशासनाने गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. नुकसानग्रस्त क्षेत्राची तातडीने पाहणी करून वस्तुनिष्ठ पंचनामे करण्यात यावेत, तसेच पात्र शेतकऱ्यांना शासनाच्या मदतीचा लाभ मिळावा यासाठी आवश्यक तो पाठपुरावा केला जाईल. *(पान २ वर)*

## गणेशोत्सवानिमित्त ‘श्री गणेश आरोग्याचा’ उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद

जालना जिल्ह्यात आतापर्यंत ६९० आरोग्य शिबिरे; ३४,७०८ नागरिकांची आरोग्य तपासणी

**जालना । प्रतिनिधी**

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाच्या मार्गदर्शनाखाली श्री गणेशा आरोग्याचा २.०* हा विशेष आरोग्य उपक्रम संपूर्ण राज्यात जिल्हा कक्षांच्या माध्यमातून राबविण्यात येत आहे. गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना त्यांच्या परिसरातच आरोग्य तपासणी व आवश्यक वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यानुसार मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय




रुग्णालय मदत कक्ष, जालना जिल्हा यांच्या नियोजनाखाली जिल्ह्यात विविध ठिकाणी आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येत असून, आतापर्यंत ६९० शिबिरांमध्ये ३४,७०८ नागरिकांची आरोग्य तपासणी करण्यात आली आहे. यामध्ये १४,६५० पुरुष, १६,३८४ महिला आणि ३,६७४ बालकांचा समावेश आहे. नागरिकांना त्यांच्या आरोग्याबाबत आवश्यक वैद्यकीय सल्ला व मार्गदर्शनही देण्यात येत आहे.

शिबिरां दरम्यान आवश्यकतेनुसार विविध आरोग्य तपासण्या करण्यात येत असून, आतापर्यंत २९० ईसीजी तसेच १,१९१ रक्त तपासण्या करण्यात आल्या आहेत.

गणेशोत्सवाच्या काळात नागरिकांनी उत्सवाचा आनंद घेत असतानाच आपल्या आरोग्याचीही काळजी घ्यावी, या उद्देशाने *श्री गणेशा आरोग्याचा २.०* हा उपक्रम राबविण्यात येत आहे. जिल्ह्यातील *(पान २ वर)*

## अकोला येथे रविवारी अखिल भारतीय मराठा महासंघाचे राष्ट्रीय प्रतिनिधी अधिवेशन–अरविंद देशमुख

*शिक्षणातून प्रगती, रोजगारातून समृद्धी महिला सशक्तीकरणातून सक्षम समाज व एकजुटीतून मराठा समाजाचा विकास या विषयावर होणार विचारमंथन*

**जालना - प्रतिनिधी**

मराठा समाजाच्या सर्वांगीण उन्नतीसाठी अविरत कार्यरत असणाऱ्या अखिल भारतीय मराठा महासंघ या ऐतिहासिक संघटनेच्या शतकोत्तर रौप्य महोत्सवी (१२५ वे वर्ष) वर्षानिमित्त अकोला येथे दि. २७ सप्टेंबर रोजी राष्ट्रीय प्रतिनिधी अधिवेशन व मराठा मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असून, त्यात संघटनातून शक्ती, संवादातून दिशा, शिक्षणातून प्रगती, रोजगारातून



समृद्धी महिला सशक्तीकरणातून सक्षम समाज व एकजुटीतून मराठा समाजाचा विकास या विषयावर विचारमंथन होणार असल्याची माहिती राष्ट्रीय विभागीय चिटणीस तथा जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख यांनी दिली.

अकोला येथील रामदास पेठमधील मराठा मंगल कार्यालयात सकाळी ११ वाजता या अधिवेशनाचे उद्घाटन राष्ट्रीय अध्यक्ष राजेंद्र कोंढरे कोण रे यांच्या हस्ते होणार असून, यावेळी राष्ट्रीय उपाध्यक्ष नरेंद्र पाटील, विनायकराव पवार, वसंतराव मुळीक, सरचिटणीस प्रमोदराव जाधव, कोषाध्यक्ष प्रकाश देशमुख, संयुक्त सरचिटणीस गुलाबराव गायकवाड, राष्ट्रीय उपाध्यक्ष वसंतराव मुळीक, विदर्भ अध्यक्ष कृष्णा अंधारे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

या राष्ट्रीय प्रतिनिधी अधिवेशनात देशभरातून मराठा महासंघाचे पदाधिकारी, प्रतिनिधी आणि समाजबांधव मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. संघटनेच्या शतकोत्तर १२५ वर्षांच्या गौरवशाली वाटचालीचा आढावा *(पान २ वर)*

## पत्रकारांनी बातमीदारी करताना आरोग्याची काळजी घ्यावी

सर्वपक्षीय नेत्यांचे आवाहन; युवा पत्रकार आशीष रसाळ यांना भावपूर्ण श्रद्धांजली

**जालना । प्रतिनिधी**

पत्रकारिता हे केवळ व्यवसायाचे क्षेत्र नसून समाजातील घडामोडी, प्रश्न, समस्या आणि जनतेचा आवाज शासन-प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वपूर्ण समाजसेवेचे कार्य आहे. लोकशाहीचा चौथा स्तंभ म्हणून पत्रकारांकडे पाहिले जाते. समाजातील बऱ्या-वाईट घटनांचे वृत्तांकन करण्यासाठी पत्रकार दिवस-रात्र धावपळ करीत असतात. मात्र, ही धावपळ करताना पत्रकारांनी स्वतःच्या आरोग्याकडेही तितकेच गांभीर्याने पाहणे गरजेचे आहे. नियमित व्यायाम, सात्त्विक आहार, पुरेशी झोप आणि तणावमुक्त जीवनशैलीचा अवलंब करून पत्रकारांनी आपले आरोग्य जपावे, असे आवाहन सर्वपक्षीय ज्येष्ठ नेत्यांनी केले. युवा पत्रकार, प्रसिद्ध



वक्ते आणि उत्कृष्ट सूत्रसंचालक आशीष रसाळ यांच्या अकाली निधनाच्या पार्श्वभूमीवर आयोजित श्रद्धांजलीपर कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनी पत्रकारांच्या आरोग्याचा मुद्दा गांभीर्याने मांडला. चाळीशीतील आशीष रसाळ यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने त्यांचे निधन झाले. त्यांच्या अकाली जाण्याने पत्रकारिता, सामाजिक, धार्मिक आणि सांस्कृतिक क्षेत्रात मोठी पोकळी निर्माण झाली असून, त्यांच्या निधनाने जालन्यातील पत्रकारिता क्षेत्राला मोठा धक्का बसला आहे. आशीष रसाळ यांनी गेल्या सुमारे वीस वर्षांच्या काळात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी झगडत पत्रकारिता क्षेत्रात स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली होती. युवा पत्रकार म्हणून काम करत असतानाच प्रभावी वक्तृत्व आणि उत्कृष्ट सूत्रसंचालनाच्या माध्यमातून त्यांनी विविध क्षेत्रांमध्ये आपला ठसा उमटविला.

मितभाषी, मनमिळाऊ आणि अजातशत्रू व्यक्तिमत्त्व अशी त्यांची सर्वत्र ओळख होती. धार्मिक, राजकीय, सामाजिक तसेच सांस्कृतिक क्षेत्रात त्यांचा सातत्याने वावर होता. कोणत्याही कार्यक्रमात आपल्या सहज, संयमी आणि आपुलकीच्या स्वभावामुळे ते अल्पावधीतच सर्वांशी जुळून जात असत. कोणालाही दुखावणार नाही, अशी त्यांची बोलण्याची आणि वागण्याची पद्धत असल्याचे उपस्थित मान्यवरांनी आपल्या आठवणी सांगताना नमूद केले.

आशीष रसाळ यांच्या निधनाने केवळ एका पत्रकाराचा नव्हे, तर विविध क्षेत्रांमध्ये आपुलकीचे संबंध निर्माण करणाऱ्या एका संवेदनशील व्यक्तिमत्त्वाचा आधार गमावल्याची भावना यावेळी व्यक्त करण्यात आली. पत्रकारांचे काम अनिश्चित वेळेचे असते. घटना घडली की वेळ, दिवस-रात्र, ऊन-पाऊस *(पान २ वर)*

## वाहेगाव-सातारा येथे मंदिराच्या कलशारोहणासह, सभामंडप भूमिपूजन उत्साहात

**आ. बबनराव लोणीकर यांच्या स्थानिक विकास निधी मधून २० लक्ष रु च्या सभामंडपाचे राहुल लोणीकर यांच्या हस्ते भूमिपूजन**

**जालना - प्रतिनिधी**

वाहेगाव-सातारा येथे श्री गणपती, विठ्ठल-रुक्मिणी, महादेव व नंदी मंदिराच्या कलशारोहण समारंभासह मंदिरासमोरील आमदार बबनराव लोणीकर यांच्या स्थानिक विकास निधीतून २० लक्ष रुपये किमतीच्या सभामंडपाचे भूमिपूजन अमोलनंद महाराज गिरी, मुकुंद महाराज काटे, बळीराम महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष राहुल लोणीकर यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. यावेळी बोलताना राहुल लोणीकर यांनी सांगितले की, आमदार बबनराव लोणीकर हे मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असून, विकासकामांसोबतच धार्मिक व सामाजिक स्थळांच्या सुविधांकडेही आमदार बबनराव लोणीकर सातत्याने लक्ष देत असून. मतदारसंघातील विविध मंदिरांसमोर तसेच समाज मंदिरांच्या परिसरात आतापर्यंत ३०० हून अधिक सभामंडप उपलब्ध करून देण्यात आले असल्याचे यावेळी बोलताना राहुल लोणीकर यांनी सांगितले. . या माध्यमातून भाविक आणि नागरिकांना धार्मिक, सामाजिक तसेच सार्वजनिक कार्यक्रमांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध होणार असून विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यासाठी संविधान निर्माण होणार असल्याचे यावेळी बोलताना राहुल लोणीकर *(पान २ वर)*

# संपादकीय...

## आसूड मोर्चा सरकारला जागे करणार का?

जालना जिल्ह्यात पावसाने दिलेला प्रदीर्घ खंड, खरीप पिकांची खालावलेली अवस्था आणि उत्पादनाच्या भविष्याबाबत निर्माण झालेली अनिश्चितता पाहता शेतकऱ्यांच्या मनातील अस्वस्थता आता रस्त्यावर येत आहे. ५ ऑक्टोबरला जिल्हाधिकारी कार्यालयावर काढण्यात येणारा आसूड मोर्चा ही केवळ काँग्रेसची राजकीय घोषणा म्हणून पाहून चालणार नाही. त्या मागे खरोखरच शेतकऱ्यांचे प्रश्न आहेत की केवळ राजकीय शक्तिप्रदर्शन आहे, याची कसोटी आंदोलनाच्या मागण्यांपेक्षा शासनाच्या प्रतिसादावर लागणार आहे. कारण शेतकऱ्याला आज घोषणा नको आहे; त्याला आपल्या शेताची वस्तुस्थिती शासनाच्या कागदावर उतरलेली पाहिजे. जालना जिल्ह्याचे हवामान आणि पर्जन्यवाटप मुळातच असमान आहे. जिल्ह्यातील बहुतांश पाऊस जून ते सप्टेंबर या चार महिन्यांत पडतो आणि तालुकानुसार सरासरी पावसातही फरक आहे. त्यामुळे एखाद्या तालुक्याची सरासरी पूर्ण झाली म्हणून त्या तालुक्यातील प्रत्येक शेतकऱ्याची पिके सुरक्षित आहेत, असा निष्कर्ष काढणे धोकादायक ठरू शकते. पाऊस किती पडला यापेक्षा तो 'कधी' पडला हा प्रश्न दुष्काळ मोजताना केवळ एकूण पावसाची आकडेवारी पुरेशी नसते. पावसाचा खंड किती दिवसांचा होता, पिकांच्या संवेदनशील अवस्थेत पाऊस मिळाला का, जमिनीतील ओलावा किती आहे, पिकांची प्रत्यक्ष वाढ कशी आहे, जलसाठ्यांची स्थिती काय आहेया सर्व बाबी महत्त्वाच्या ठरतात. महाराष्ट्रातील दुष्काळ मूल्यांकनाच्या पद्धतीतही पर्जन्यमान व कोरडा खंड यांसोबत शेती, मातीतील ओलावा, पेरणी क्षेत्र, भूजल व जलसाठे यांसारख्या निर्देशकांचा विचार केला जातो. म्हणूनच आता प्रशासनासमोर सर्वात मोठे आव्हान आहे ते 'कागदावरील पाऊस' आणि 'शेतातील वास्तव' यातील अंतर संपवण्याचे.

पंचनामे झाले म्हणजे मदत मिळाली असे होत नाही

नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या पीक नुकसानीसाठी शासनाच्या यंत्रणेत पंचनामा, तहसील स्तरावरील संकलन आणि जिल्हाधिकारी स्तरावर माहिती एकत्रित करण्याची प्रक्रिया आहे. अधिसूचित आपत्तीच्या निकषांनुसार मदतीची तरतूदही आहे. पण शेतकऱ्याचा खरा प्रश्न येथेच सुरू होतो.

पंचनामा किती झाला?

नुकसान किती नोंदले?

मदत किती मंजूर झाली?

आणि प्रत्यक्ष खात्यावर किती पोहोचली?

या चार प्रश्नांची उत्तरे पारदर्शकपणे सार्वजनिक झाली पाहिजेत. कारण शेतकरी कार्यालयाच्या फेऱ्या मारत राहिला आणि फाईल एका टेबलवरून दुसऱ्या टेबलवर फिरत राहिली, तर सरकारी मदतीची घोषणा त्याच्यासाठी कागदावरील आश्वासनच ठरते.

मागील नुकसानभरपाईचा हिशेब आधी स्पष्ट करा काँग्रेसने मागील वर्षाच्या नुकसानीची मदत अद्याप प्रलंबित असल्याचा आरोप केला आहे. हा आरोप राजकीय आहे; त्यामुळे त्याची अधिकृत आकडेवारी प्रशासनाने स्पष्ट करणे आवश्यक आहे. किती शेतकऱ्यांचे नुकसान मंजूर झाले? किती जणांना पैसे मिळाले? किती प्रकरणे प्रलंबित आहेत? प्रलंबित राहण्याची कारणे कोणती? याचा तालुकानिहाय हिशेब जिल्हाधिकारी कार्यालयाने जाहीर केला, तर राजकीय आरोपांना उत्तर देण्यासाठी वेगळ्या भाषणांची गरज उरणार नाही. आसूड मोर्चाची खरी ताकद घोषणांमध्ये नव्हे, मागण्यांच्या स्पष्टतेत ५ ऑक्टोबरचा मोर्चा निघणार असेल तर त्याच्या केंद्रस्थानी स्पष्ट आणि मोजता येण्याजोग्या मागण्या असायला हव्यात. दुष्काळी परिस्थितीचे तालुकानिहाय वस्तुनिष्ठ मूल्यांकन, पीक नुकसानीचे तातडीने सर्वेक्षण, पीक विम्याच्या दाव्यांचा जलद निपटारा, पात्र शेतकऱ्यांना नुकसानभरपाई, कर्जवसुलीबाबत दिलासा, आगामी रब्बी हंगामासाठी पाणी व निविष्ठांचे नियोजन आणि ग्रामीण रोजगाराची उपलब्धताया मुद्द्यांवर ठोस वेळापत्रक सरकारकडून मागितले पाहिजे.

कारण मोर्चा संपल्यानंतर प्रश्न संपत नाहीत.

शेतकरी हा राजकीय गर्दीचा आकडा नाही

दुष्काळाच्या काळात सत्ताधारी आणि विरोधक दोघांनीही आत्मपरीक्षण करणे गरजेचे आहे. विरोधकांनी शेतकऱ्यांच्या वेदनेला केवळ राजकीय आंदोलनाचे रूप देऊ नये आणि सत्ताधाऱ्यांनी आंदोलनाकडे केवळ राजकीय विरोध म्हणून पाहू नये. शेतकरी हा कोणत्याही पक्षाचा मतदारसंघातील आकडा नाही; तो राज्याच्या अर्थव्यवस्थेचा आधार आहे.

शेती कोसळली की त्याचा परिणाम शेतमजुरावर होतो, कृषी सेवा केंद्रावर होतो, खत-बियाणे विक्रेत्यावर होतो, ट्रॅक्टर आणि वाहतूक व्यवसायावर होतो, ग्रामीण बाजारपेठेवर होतो. त्यामुळे दुष्काळ हा केवळ शेताच्या बांधावरचा प्रश्न नसून संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेचा प्रश्न आहे. सरकारने आंदोलनाची वाट पाहू नये सर्वात महत्त्वाचा प्रश्न हा आहे की, शेतकऱ्यांना आसूड मोर्चा काढावा का लागतो? प्रशासनाने आधीच पर्जन्यमान, पिकांची स्थिती, जलसाठे, भूजल आणि पीक नुकसानीची आकडेवारी तपासून आवश्यक उपाययोजना सुरू करणे अपेक्षित आहे. राज्याच्या आपत्ती व्यवस्थापन व्यवस्थेत दुष्काळ हा अधिसूचित नैसर्गिक आपत्तीमध्ये समाविष्ट आहे आणि च्या माध्यमातून तातडीच्या मदतीची व्यवस्था आहे. म्हणूनच ५ ऑक्टोबरच्या मोर्चाची वाट पाहण्यापेक्षा ४ ऑक्टोबरपूर्वीच प्रशासनाने शेतकऱ्यांसमोर आपला कृती आराखडा ठेवला तर ते अधिक महत्त्वाचे ठरेल. आता आकडे बोलले पाहिजेत, आश्वासने नव्हे! जालना जिल्ह्यात दुष्काळ आहे की दुष्काळसदृश परिस्थिती आहे, याचा अंतिम निर्णय राजकीय व्यासपीठावर नव्हे तर अधिकृत निकष, प्रत्यक्ष सर्वेक्षण आणि उपलब्ध आकडेवारीच्या आधारे झाला पाहिजे. पण त्याचवेळी, दुष्काळ जाहीर करण्याच्या प्रक्रियेत आकडेवारी गोळा होत असताना शेतकऱ्याला मदतीपासून वंचित ठेवणेही योग्य ठरणार नाही.

शेतकऱ्याच्या शेतातील उभे पीक जळत असताना फाईल हिरवी ठेवण्याला अर्थ नाही. ५ ऑक्टोबरचा आसूड मोर्चा त्यामुळे सरकारसाठी केवळ राजकीय इशारा नसून प्रशासनाच्या संवेदनशीलतेची परीक्षा आहे. मोर्चा किती मोठा झाला, किती घोषणा झाल्या आणि कोणत्या पक्षाचे किती कार्यकर्ते सहभागी झालेयापेक्षा महत्त्वाचे हेचः शेतकऱ्याच्या शेताची पाहणी झाली का? नुकसानाची नोंद झाली का? पीक विम्याचा हक्क मिळाला का? मदत प्रत्यक्ष खात्यावर पोहोचली का?

आणि पुढील हंगामासाठी शेतकऱ्याला जगण्याचा आधार मिळाला का? या प्रश्नांची समाधानकारक उत्तरे मिळाली, तरच आसूड मोर्चाचा खरा अर्थ सिद्ध होईल.

## पान १ व ४ वरुन...

### 'व्यक्तिगत टीका...

महत्त्वाचे आहे.

**'मिशा त्यांना आहेत, तर आम्हालाही आहेत'**

मनोज जरांगे पाटील यांच्या आक्रमक वक्तव्यांचा संदर्भ देताना खोतकर यांनी तीव्र शब्दांत प्रतिक्रिया दिली.

''शिव्या देणे, मिशांवर ताव देऊन शिंदे साहेबांना आव्हान देणे, हा प्रकार योग्य नाही. मिशा त्यांना आहेत तर मिशा आम्हालाही आहेत, हे विसरू नका,'' असे खोतकर म्हणाले.

''शिवसेनेच्या वरिष्ठ नेत्यावर व्यक्तिगत टीका केली तर शिवसेना शांत बसणार नाही. आम्ही अवमान सहन करणार नाही. इथून पुढे आरोपही सहन केले जाणार नाहीत. त्यामुळे आपली भाषा सुधारा,'' असा सल्लाही त्यांनी जरांगे पाटील यांना दिला.

**'राजकारणात पडू नका; समाजाचे प्रश्न पुढे न्या'**

खोतकर यांनी जरांगे पाटील यांना राजकीय वादाऐवजी मराठा समाजाच्या प्रश्नांवर लक्ष केंद्रित करण्याचे आवाहन केले.

''तुम्ही समाजाचे प्रश्न पुढे न्या. समाजाच्या प्रश्नांसाठी आम्ही कायम तुमच्या सोबत आहोत. मात्र, व्यक्तिगत टीका करण्यापेक्षा समाजाच्या प्रश्नांवर विधायक भूमिका घ्या. राजकीय संघर्षात पडू नका,'' असे खोतकर म्हणाले.

त्यांच्या या भूमिकेतून एकीकडे जरांगे यांच्या सामाजिक आंदोलनाला समर्थन देण्याची भूमिका तर दुसरीकडे एकनाथ शिंदे यांच्यावरील टीकेला विरोध, असा दुहेरी संदेश देण्यात आला.

**शिवसेनेच्या आढावा बैठकीनंतर दुष्काळ पाहणी दौरा**

दरम्यान, शिवसेनेचे सचिव भाऊसाहेब चौधरी हे पदाधिकारी व संघटनेच्या आढावा बैठकीसाठी जालना दौऱ्यावर आले आहेत. या बैठकीनंतर दुष्काळग्रस्त भागाचा पाहणी दौरा करण्यात येणार असल्याची माहितीही आमदार अर्जुनराव खोतकर यांनी दिली.

मराठवाड्यातील दुष्काळी परिस्थिती, शेतकऱ्यांच्या अडचणी आणि पीक नुकसानीच्या पार्श्वभूमीवर या पाहणी दौऱ्यात स्थानिक परिस्थितीचा आढावा घेतला जाणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

**'वैयक्तिक संघर्षापेक्षा समाजाचे प्रश्न महत्त्वाचे'**

पत्रकार परिषदेत खोतकर यांनी आपल्या भूमिकेचा पुनरुच्चार करताना व्यक्तिगत आरोप-प्रत्यारोपांपेक्षा समाजाच्या प्रश्नांना प्राधान्य देण्याचे आवाहन केले. ''समाजाच्या प्रश्नांवर विधायक भूमिका घेतली तर आम्ही सोबत राहू; मात्र व्यक्तिगत पातळीवरील टीका सुरू राहिल्यास त्याला प्रत्युत्तर दिले जाईल,'' असे त्यांनी स्पष्ट केले. यामुळे मराठा आरक्षणाच्या प्रश्नावरून सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर शिवसेना आणि मनोज जरांगे पाटील यांच्यातील शाब्दिक संघर्ष आणखी तीव्र होण्याची शक्यता असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

### नवीन मोंढ्यात...

गेलेली रोख रक्कम आणि बेसनची बॅग असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नवीन मोंढा, जालना येथील दिनेशकुमार ट्रेडिंग या होलसेल किराणा दुकानात २० सप्टेंबर रोजी रात्री ९ ते ११ वाजेच्या दरम्यान चोरीची घटना घडली. दुकानाचे मालक किसनलाल मुलचंदजी भक्कड (वय ६४, रा. श्रीकृष्ण रुख्मीणी नगर, जालना) यांनी याबाबत चंदनझिरा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

तक्रारीनुसार, अज्ञात चोरट्याने दुकानाच्या छतावरील पत्रे कापून दुकानात प्रवेश केला. त्यानंतर दुकानातील गल्ल्यात ठेवलेली रोख रक्कम चोरून नेण्यात आली. घटनेची माहिती मिळताच चंदनझिरा पोलिसांनी गुन्हा दाखल करून तपासाला सुरुवात केली. चोरीची पद्धत आणि घटनास्थळावरील माहितीच्या आधारे पोलिसांनी तपासाची चक्रे वेगाने फिरवली. पोलीस निरीक्षक किरण बिडवे यांनी गुन्हा उघडकीस आणण्यासाठी पोलीस अधिकारी व अंमलदारांना आवश्यक सूचना दिल्या. त्यानुसार पोलिसांनी गोपनीय माहितीच्या आधारे तपास सुरू केला. तपासादरम्यान पोलिसांना मिळालेल्या माहितीनुसार, विशाल विष्णू वाढेकर (रा. जामवाडी, ता. जि. जालना) हा काही दिवसांपासून नवीन मोंढा परिसरातील किराणा दुकानांमध्ये काम करीत असल्याचे समोर आले. त्यानंतर पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला.

पोलिसांच्या तपासादरम्यान २२ सप्टेंबर रोजी विशाल वाढेकर हा जामवाडी परिसरात मिळून आला. त्यास पोलिसांनी ताब्यात घेऊन चोरीच्या घटनेबाबत चौकशी केली.

पोलिसांच्या माहितीनुसार, चौकशीदरम्यान विशाल वाढेकर याने दिनेशकुमार ट्रेडिंग या दुकानाच्या छतावर चढून पत्रा कापला आणि दुकानाच्या आत प्रवेश केला. त्यानंतर दुकानाच्या गल्ल्यातील १४ हजार रुपये रोख रक्कम तसेच अंदाजे ९०० रुपये किमतीची विनार कंपनीची बेसनची एक बॅग चोरी केल्याची कबुली दिल्याचे पोलिसांनी सांगितले.

पोलिसांनी त्याच्याकडून चोरीचा मुद्देमाल जप्त केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस अंमलदार विशाल लोखंडे करीत आहेत.

ही कारवाई पोलीस अधीक्षक तेगबीरसिंह संधू, अपर पोलीस अधीक्षक विक्रम साळी आणि उपविभागीय पोलीस अधिकारी अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

चंदनझिरा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किरण बिडवे, पोलीस उपनिरीक्षक मारियो स्कॉट, पोलीस हेड कॉन्स्टेबल कृष्णा तंगे, अशोक जाधव, पोलीस अंमलदार विशाल लोखंडे आणि गजानन काकडे यांनी या कारवाईत सहभाग घेतला.

नवीन मोंढ्यासारख्या व्यापारी परिसरात दुकानांचे शटर, छत आणि सुरक्षिततेच्या उपाययोजनांचा गैरफायदा घेत चोरीच्या घटना घडू नयेत, यासाठी व्यापाऱ्यांनी रात्रीच्या वेळी दुकानांच्या सुरक्षेकडे विशेष लक्ष देण्याची गरज या घटनेतून अधोरेखित झाली आहे.

### पावसाच्या खंडामुळे...

पावसाच्या खंडाचा सोयाबीनबरोबरच कापूस, तूर आणि मूग या पिकांवरही विपरीत परिणाम झाला आहे. त्यामुळे नुकसानग्रस्त क्षेत्राचे सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना पीक विमा, दुष्काळी मदत तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी प्रशासनाने आवश्यक कार्यवाही करावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली. शेतकऱ्यांच्या अडचणी केवळ कागदोपत्री न पाहता प्रत्यक्ष शेतात जाऊन समजून घेणे आवश्यक आहे. सध्याच्या परिस्थितीत शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी प्रशासनाने तातडीने कार्यवाही करावी. नुकसानग्रस्त प्रत्येक शेतकऱ्याला योग्य ती मदत मिळवून देण्यासाठी शासन स्तरावर पाठपुरावा करू, असे भास्कर आबा दानवे यांनी यावेळी सांगितले.

दरम्यान, शेतकऱ्यांनी पावसाअभावी झालेल्या नुकसानीची माहिती भास्कर आबा दानवे यांच्यासमोर मांडली. पीक नुकसानीचे पंचनामे तातडीने करून पीक विमा व शासनाच्या मदतीचा लाभ मिळावा, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली.

या पाहणी दौऱ्यावेळी जिल्हा उपाध्यक्ष श्री. सिद्धिविनायक मुळे, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष श्री. भागवत बापू बावणे, शरद बावणे, अनिकेत खेडकर, अजित खेडकर यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.

### गणेशोत्सवानिमित्त...

नागरिकांनी आपल्या जवळच्या आरोग्य शिबिराचा लाभ घेऊन आवश्यक आरोग्य तपासणी करून घ्यावी, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष, जालना जिल्हा यांच्या वतीने करण्यात आले आहे. शिबीराच्या यशस्वीतेसाठी जिल्हा कक्षाचे डॉ सोपान विक्रम चव्हाण परिश्रम घेत आहेत.

### अकोला येथे...

घेणे, समाजासमोरील सद्यकालीन सामाजिक, शैक्षणिक व आर्थिक आव्हानांवर विचारमंथन करणे आणि महासंघाची भावी दिशा ठरवणे हा या अधिवेशनाचा मुख्य उद्देश आहे. या सर्व प्रमुख पदाधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली अधिवेशनाची रूपरेषा व पुढील संघटनात्मक ठराव मांडले जाणार आहेत. मराठा समाजाची एकजूट अधिक बळकट करण्यासाठी आणि समाजातील विविध घटकांच्या सक्षमीकरणासाठी हे राष्ट्रीय प्रतिनिधी अधिवेशन अत्यंत महत्त्वाचे ठरणार आहे. या ऐतिहासिक शतकोत्तर रौप्य महोत्सवी राष्ट्रीय अधिवेशनास समाजबांध, कार्यकर्ते आणि प्रतिनिधींनी बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन अरविंद देशमुख यांच्यासह जिल्हा मराठा महासंघाचे पदाधिकारी अशोक पडूळ, सुभाष चव्हाण, संतोष कराळे, शैलेश देशमुख, मंगेश मोरे, अजय कोल्हे, रवीकुमार सूर्यवंशी, कृष्णा यादव, संतोष ढेंगळे, विष्णू पिवळ, कैलास ढमाले, अनिल मदन, कमलेश काथोटे, प्रभाकर केदारे, सुजित मोटे आदींनी केले आहे.

### वाहेगाव-सातारा...

म्हणाले पुढे बोलताना ते म्हणाले की गावातील मंदिर हे केवळ धार्मिक श्रद्धेचे केंद्र नसून सामाजिक आणि सांस्कृतिक उपक्रमांचेही केंद्र असते. त्यामुळे मंदिर परिसरात आवश्यक सुविधा निर्माण करण्याला प्राधान्य दिले जात असल्याचे राहुल लोणीकर यांनी यावेळी नमूद केले. वाहेगाव-सातारा येथे उभारण्यात येणारा सभा मंडप व सभागृह भाविकांसाठी तसेच ग्रामस्थांच्या विविध कार्यक्रमांसाठी निश्चितच उपयुक्त ठरणार आहे. धार्मिक कार्यक्रम, सामाजिक उपक्रम, ग्रामस्थांच्या बैठका तसेच विविध सार्वजनिक कार्यक्रमांसाठी या सभागृहाचा उपयोग होणार असल्याने गावाच्या सामाजिक जीवनाला त्याचा फायदा होणार आहे असेही श्री राहुल लोणीकर यांनी सांगितले पुढे बोलताना राहुल लोणीकर म्हणाले की मतदार संघाचा सर्वांगीण विकास करत असताना आमदार बबनराव लोणीकर यांनी प्रत्येक गावाला रस्त्याने जोडण्याचे काम केलेले असून, गावांतर्गत सिमेंट रस्ते, शेतकऱ्यांसाठी विविध वयक्तिक लाभंच्या योजना, निराधार दिव्यांगांसाठी संजय गांधी निराधार योजना श्रावण बाळ योजना यासह सिंचन क्षेत्र वाढावे यासाठी नाला खोलीकरण सरळीकरणाचे अनेक कामे आमदार लोणीकरांनी केली असल्याचे यावेळी बोलताना त्यांनी सांगितले पुढे बोलताना ते म्हणाले की येणाऱ्या काळाची विकासाचा ओघ कायम ठेवून मतदार संघाला सुजलाम सुफलाम बनवण्याचा आमचा प्रयत्न असल्याचे यावेळी बोलताना राहुल लोणीकर यांनी सांगितले

कलशारोहण सोहळ्यामुळे मंदिर परिसरात भक्तिमय वातावरण निर्माण झाले होते. ग्रामस्थ आणि भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कलशारोहण सोहळ्यात सहभाग घेतला. या वेळी देविदास राव काटे , अर्जुन काटे भीमराव काटे अंबादास काटे मच्छिंद्र काटे सुंदर काटे अनंता काटे अमोल काटे सुनील काटे रोहन वाघमारे योगेश काटे महेश काटे महेश जगताप कृष्णा काटे पवन काटे राहुल गायके यांच्यासह मोठ्या संख्येने परिसरातील नागरिकांची उपस्थिती होती

### पत्रकारांनी बातमीदारी...

याचा विचार न करता घटनास्थळी पोहोचून बातमी संकलित करण्याची जबाबदारी पत्रकार पार पाडतात. अनेकदा सततचा मानसिक ताण, अपुरी झोप, अनियमित आहार आणि व्यायामाचा अभाव यामुळे आरोग्याकडे दुर्लक्ष होते. आशीष रसाळ यांच्या अकाली निधनाच्या घटनेने या बाबीकडे गांभीर्याने पाहण्याची गरज निर्माण झाली आहे. पत्रकारांनी समाजासाठी काम करताना स्वतःच्या आरोग्याचीही काळजी घ्यावी. नियमित आरोग्य तपासणी, व्यायाम, संतुलित आहार आणि पुरेशी झोप यांना जीवनाचा भाग बनवावे, असे आवाहन यावेळी करण्यात आले. यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी आशीष रसाळ यांच्या कुटुंबीयांना आवश्यक ती मदत करण्यासाठी निश्चितपणे पुढाकार घेतला जाईल, असे सांगितले. रसाळ यांच्या कुटुंबाच्या पाठीशी उभे राहण्याची भावना त्यांनी व्यक्त केली. माजी मंत्री राजेश टोपे यांनीही आशीष रसाळ यांच्या कुटुंबीयांबद्दल सहवेदना व्यक्त करून आवश्यक मदतीची भावना व्यक्त केली. माजी नगराध्यक्ष भास्कर अंबेकर यांनी आशीष रसाळ यांच्यासोबतच्या अनेक आठवणींना उजाळा देत त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील आपुलकी, सकारात्मकता आणि सर्वांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध यांचा उल्लेख केला.

उपमहापौर राजेश राऊत यांनी आशीष रसाळ यांच्या व्यक्तिमत्त्वाचे अनोखे वर्णन केले. ते म्हणाले की, आशीष रसाळ म्हणजे एक असे रसायन होते की, ज्या क्षेत्रात ते मिसळले जात, त्या क्षेत्रातील लोकांशी त्यांचे आपुलकीचे नाते निर्माण होत असे. विविध उपक्रमांमध्ये त्यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला.

विशेषतः पर्यावरणपूरक गणपतींच्या स्पर्धांच्या आयोजनाचा उल्लेख करताना राऊत यांनी सांगितले की, स्पर्धेचे निकष निश्चित करण्यापासून ते अंतिम निकालापर्यंतच्या संपूर्ण प्रक्रियेत आशीष रसाळ यांची मोलाची साथ लाभत असे. त्यांच्या सहभागामुळे अशा सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांना अधिक व्यापक स्वरूप मिळत असल्याचेही त्यांनी नमूद केले. आशीष रसाळ यांच्या अकाली निधनाने जालना शहरातील पत्रकारिता क्षेत्रात हळहळ व्यक्त होत आहे. तरुण वयात पत्रकारितेला वाहून घेत विविध क्षेत्रांमध्ये निर्माण केलेली त्यांची ओळख आणि मित्रत्वाचे संबंध यामुळे त्यांच्या जाण्याने अनेकांना मोठा धक्का बसला आहे. कार्यक्रमात उपस्थित पत्रकारांनीही रसाळ यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांच्या स्वभावातील आपुलकी, सहकार्याची भावना आणि प्रत्येकाशी जुळवून घेण्याची हातोटी यांचा उल्लेख केला. पत्रकारितेच्या धावपळीत सहकाऱ्यांशी असलेले नाते जपणारा आणि सामाजिक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेणारा सहकारी गमावल्याची भावना अनेकांनी व्यक्त ेली. यावेळी शिवसेना महानगरप्रमुख विष्णू पाचफुले, नाट्यकुंरचे ध. स. जैन, फेरोज अली, ज्येष्ठ पत्रकार अंकुशराव देशमुख, लक्ष्मणराव राऊत, गुलाब पाटील, लियाकत अली खान, नारायण वाढेकर, भरत मानकर, दीपक शेळके, सुशीलकुमार वाठोरे, लहू गाडे, कैलास फुलारी, सीताराम तुपे, विष्णू कदम, सुनील नरवडे, नरेंद्र जोगड, मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अरविंद देशमुख, अभियंता भुरेवाल, संजय देशमुख, महेश बुलगे, शरद सोनटक्के, रवी शिंदे यांच्यासह पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

**कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धनसिंह सूर्यवंशी यांनी केले.**

आशीष रसाळ यांच्या निधनाच्या निमित्ताने पत्रकारांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. बातमीच्या मागे धावताना स्वतःच्या आरोग्याकडे दुर्लक्ष होऊ नये, हा संदेश या श्रद्धांजली कार्यक्रमातून पुढे आला. पत्रकारांनी समाजाच्या प्रश्नांसाठी आपली लेखणी आणि कॅमेरा सदैव सज्ज ठेवतानाच स्वतःच्या आरोग्यासाठीही वेळ देणे आवश्यक आहे.

आशीष रसाळ यांच्या आठवणींना उजाळा देताना उपस्थितांनी त्यांच्या कार्याला आदरांजली वाहिली आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होत भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

### पांदण रस्ते...

आमरण उपोषण करण्याचा इशारा योगेश गगणे यांनी दिला आहे. निवेदनाची प्रत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही पाठविण्यात आली असल्याचे नमूद करण्यात आले आहे.

*वरील सर्व आरोप निवेदनातील दाव्यांवर आधारित असून, संबंधित विभागाची अधिकृत बाजू किंवा चौकशीचा निष्कर्ष अद्याप समोर आलेला नाही.

### आनंदगडावर ब्रह्मर्षी...

पुतळ्याच्या उभारणीसाठी विश्व हिंदू परिषदेचे जिल्हाध्यक्ष शिवरतन मुंदडा तसेच देवगिरी कल्याण आश्रमाचे उपाध्यक्ष दिलीप चेचाणी यांनी विशेष सहकार्य केले आहे.

आनंदगड संस्थानच्या धार्मिक व सामाजिक उपक्रमांच्या परंपरेत या कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले असून, धार्मिक श्रद्धेसोबतच सामाजिक समरसता, जनजातीय इतिहास आणि सांस्कृतिक वारशाचे दर्शन या निमित्ताने घडणार आहे. या धार्मिक व ऐतिहासिक सोहळ्यास परिसरातील भाविक, नागरिक, जनजातीय बांधव, देशभक्त तसेच भक्तगणांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

ब्रह्मर्षी मतांग ऋषींच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा आणि क्रांतिवीर टंट्या मामा भिल्ल यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण या दुहेरी सोहळ्यामुळे आनंदगड परिसरात भक्ती, अध्यात्म, इतिहास आणि सांस्कृतिक अभिमानाचा संगम अनुभवायला मिळणार आहे.

### सत्तेच्या आसनावर सज्जन...

संसारासाठी आणि संपत्तीसाठी जसा वेळ देतो, तसाच काही वेळ आत्मचिंतन, साधना, भक्ती आणि चैतन्याच्या विकासासाठी दिला पाहिजे. माणसाने बाहेरच्या जगात किती मिळवले यापेक्षा स्वतःच्या अंतरंगात किती मिळवले, हा खरा प्रश्न आहे. शरीर नश्वर आहे, संपत्ती नश्वर आहे, कीर्तीही नश्वर आहे; मात्र या सर्वांच्या पलीकडे असलेल्या चैतन्याचा शोध घेणे हेच जीवनाचे खरे सार्थक आहे. शरीरासाठी जगताना चैतन्याला विसरू नका; संसाराची कर्तव्ये पार पाडताना अध्यात्माला दूर करू नका; संपत्ती, सत्ता आणि कीर्ती मिळवताना त्यांचे गुलाम होऊ नका आणि महान होण्यापूर्वी स्वतःच्या विचारांशी व आचरणाशी प्रामाणिक राहा, असे ते म्हणाले. समाज, धर्म आणि सेवा कार्यात येणारे अश्रूच परमात्म्यातजवळ नेऊन पोहोचवितात. मानवाचे दैनंदिन आचरण आणि कर्तव्यपालन हेच खरे धर्मपालन आहे. संकटाच्या प्रसंगी धैर्य आणि सकारात्मक वृत्ती ठेवून समाजासाठी उपयुक्त जीवन जगावे, कुणाचीही ईर्ष्या करू नये. आपण जे काही धन, संपत्ती, पैसा प्राप्त करतो ते सर्व काही नश्वर आहे. त्यात शाश्वत असे काहीच नाही. जो तो बेचैन आहे. संसारातील प्रत्येक जीवात्मा सुखाच्या शोधात आहे. आपल्याला दररोज थोडे फार सुख मिळते ही मात्र ते अखंडित नसते. सुखाने दुख यालाच जीवन असे नाव आहे. ते ज्याला आनंदात जगता येते तोच खरा सुखी आहे. आनंद आपल्या आतच असतो. मात्र आपण त्याला पाहण्याचा प्रयत्न करत नाही. हा आनंद शब्द, सुर, रस, हॉटेल, देश, विदेशात शोधतो. या आनंदासाठी भटकंती करत राहतो. मात्र तिथे आनंद मिळते का असा प्रश्न करून महाराज म्हणाले की, आनंद बाहेर कोठेही नाही, भौतिक सुखातही नाही. आनंदाची अखंड प्राप्ती श्रीमद्□ भगवद्गीता आणि भागवत कथेच्या श्रवणात आहे. देवाचा शोध बाहेर घेण्यापेक्षा अंतःकरणात घ्या; भक्तीने मन शुद्ध करा, ज्ञानाने जीवन समजून घ्या आणि सेवाभावी कर्मातून त्या ज्ञानाची प्रचिती द्या. जीवनातील सर्व समस्यांचे समाधान आपणास ऋषीमुनींनी दिलेले आहे. संत कृपेनेच भक्ती प्राप्त होते, असे ते म्हणाले. प्रत्येकाला कुठलीही मर्यादा किंवा परावलंबित्व नसलेले, स्वतःच्या अंतःकरणातून अनुभवता येणारे अनंत समाधान आणि आनंद हवा असून तो आपल्या आत शोधण्याऐवजी बाहेर कसा शोध घेतला जातो आहे, हे त्यांनी विविध उदाहरणे देऊन स्पष्ट केले. शेवटी मुख्य यजमान, दैनिक यजमान आणि आरती यजमान संजय दाड, संतोष करवा, शामसुदंर लखोटीया, उमेश दाड, बद्रीनारायणजी बियानी, सतिश राठी, किशोर अग्रवाल, मनोज मोहता, राजेश राऊत, मिश्रिलाल बांगड, रामेश्वर बजाज, विष्णुप्रसाद दायमा, विनोद कुमावत, विनोद पवार, सुभाष दरक, कैलाश बियानी यांच्याहस्ते आरती करण्यात आली. २६ सप्टेंबरपर्यंत दररोज दुपारी २ ते ६ या वेळेत चालणाऱ्या या सात दिवसीय भागवत कथा श्रावणाचा भाविकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन भक्ती ज्ञानगंगा श्रीमद्□ भागवत कथा समिती आणि सकल हिंदू समाजाच्यावतीने करण्यात आले आहे.

### अपर जिल्हादंडाधिकारी...

ज्यामुळे राज्याची सुरक्षितता धोक्यात येईल किंवा कोणतीही वस्तु बाळगणार नाही.

तसेच अपर जिल्हादंडाधिकारी जालना यांना प्राप्त अधिकारानुसार पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (३) अन्वये पाच किंवा अधिक व्यक्तींना जमण्यास किंवा सभा, मिरवणुका, मोर्चा काढण्यास मनाई केली आहे.

हा आदेश कामावरील कोणताही अधिकारी किंवा कर्मचारी यांना लागु होणार नाही. तसेच विवाह, अंत्ययात्रा आणि पोलीस अधिक्षक जालना व उपविभागीय पोलीस अधिकारी जालना, अंबड, परतुर, भोकरदन यांनी विशेषरित्या परवानगी दिलेल्या मिरवणुका, सभा, मोर्चा यांना लागु राहणार नाही. हा आदेश संपुर्ण जिल्ह्यासाठी दि.४ ऑक्टोबर २०२६ रोजीचे रात्री १२.०० वाजेपर्यंत अंमलात राहील. असे आदेशात नमुद करण्यात आले आहे.

### जुना जालन्यात....

व्यापक स्वरूप देण्याचे आवाहन करत गांधी चमन आणि जुना जालना भागातील गणेश मंडळात भेट देऊन स्वाक्षरी फॉर्म देण्यात आले. यावेळी अभिमन्यू खोतकर म्हणाले की, तत्कालीन मुख्यमंत्री व विद्यमान उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र शासनाने गोमातेला 'राज्यमाता' दर्जा देऊन ऐतिहासिक पाऊल उचलले आहे. आता हाच सन्मान देशपातळीवर मिळण्यासाठी गोमातेला राष्ट्रमाता घोषित केले पाहिजे आणि देशभरातील गोहत्या समूळ नष्ट झाली पाहिजे. या लोकभावनेचा आदर करत १ लाख नागरिकांच्या सह्यांचे निवेदन जिल्हाधिकाऱ्यांना सादर करून हा लढा अधिक तीव्र केला जाईल. याप्रसंगी कमलेश खरे, दुर्गेश कटोटीवाले, श्री गणेश महासंघाचे अध्यक्ष श्लोक अग्रवाल, महासचिव भूषण यादव यांनीही मनोगत व्यक्त केले.

# पीक परिस्थितीच्या पाहणीसाठी मुख्यमंत्री शेतकऱ्यांच्या बांधावर

## पिकांचे सरसकट नुकसान; मदतही सरसकट देणार-मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**लातूर - प्रतिनिधी**

मराठवाड्यासह राज्यातील अनेक जिल्ह्यांत यावर्षी अतिशय कमी पाऊस पडला आहे. त्यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाल्याचे दिसून येत आहे. लातूर जिल्ह्यात सर्वात कमी म्हणजेच केवळ ५० टक्के पाऊस झाला असून, येथील नदी-नाले व विहिरी कोरड्या पडल्या आहेत. पावसाअभावी पिकांचे सरसकट नुकसान झाल्याचे दिसत असून, राज्य शासनही शेतकऱ्यांना सरसकट मदत करेल. या संकटकाळात शेतकऱ्यांना एकटे न सोडता शासन पूर्ण ताकदीने त्यांच्या पाठीशी उभे राहून आवश्यक ती सर्व मदत करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.





पीक परिस्थितीच्या पाहणीसाठी मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या दौऱ्याला लातूर येथून सुरुवात झाली. यावेळी त्यांनी लातूर जिल्ह्यातील जाऊ आणि खरोसा येथे शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन खरीप पिकांच्या नुकसानीची पाहणी केली व शेतकऱ्यांशी थेट संवाद साधला. या प्रसंगी लातूरचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, जिल्हा परिषद अध्यक्षा उषाताई पाटील, खासदार ओमप्रकाश राजेनिंबाळकर, आमदार बसवराज पाटील, आमदार संभाजी पाटील निलंगेकर, आमदार संजय बनसोडे, आमदार अभिमन्यू पवार यांच्यासह प्रशासनातील वरिष्ठ अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

राज्यात यंदा दुष्काळाची भीषणता १९७२ पेक्षाही अधिक तीव्र राहण्याची शक्यता आहे. या बाबीचे गांभीर्य लक्षात घेऊन राज्य शासनाने गतीने पावले उचलली आहेत. लवकरच दुष्काळाबाबतची अधिसूचना प्रसिद्ध केली जाईल. संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट मदत जमा करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे, असे मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले. शेतकऱ्यांचे सुमारे ४८ हजार कोटी रुपयांचे कृषिपंप वीज बिल यापूर्वीच माफ केले असून, यापुढेही त्यांना वीज बिल भरावे लागणार नाही. तसेच पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमुक्ती योजना राबवून शेतकऱ्यांना शासनाने दिलासा दिला असून, या योजनेचा लाभ प्रत्येक पात्र शेतकऱ्याला मिळेपर्यंत तिची अंमलबजावणी सुरूच राहील, असेही त्यांनी स्पष्ट केले.

### संकटकाळात सर्वतोपरी मदत करणार

दुष्काळी परिस्थितीचा सामना करण्यासाठी पिण्याचे पाणी व जनावरांच्या चाऱ्याचे योग्य नियोजन करण्यात येईल. तसेच शेतकऱ्यांना अन्नधान्यासह आवश्यक ती सर्व मदत करण्यासाठी पावले उचलली जात आहेत. जलसंधारणाची आणि रोजगार निर्मितीची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घेण्यात येतील.

या संकटात राज्य शासन पूर्ण ताकदीने शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहील. पुढचे काही महिने अतिशय आव्हानात्मक असून या काळात धीर सोडू नका; संकटाचा सामना आपण सर्वजण एकजुटीने करूया, असे आवाहन मुख्यमंत्र्यांनी केले. तसेच बंद असलेल्या पाणीपुरवठा योजना लवकरात लवकर सुरू करण्यात येतील, असेही त्यांनी सांगितले.

### शेतकऱ्याला हुंदका अनावर; मुख्यमंत्र्यांकडून दिलासा

निलंगा तालुक्यातील जाऊ येथे मुख्यमंत्र्यांना पीक नुकसानीची माहिती देताना नूर पटेल हे शेतकरी भावूक झाले. वाळलेली पिके पाहून त्यांना हुंदका अनावर झाला. यावेळी मुख्यमंत्र्यांनी त्यांचा हात हातात घेऊन, ''घाबरू नका, राज्य शासन या संकटात पूर्णपणे तुमच्यासोबत आहे. सर्वतोपरी मदत केली जाईल, असा धीर देत दिलासा दिला. तसेच या ठिकाणी उपस्थित महिला शेतकऱ्यांशीही मुख्यमंत्र्यांनी संवाद साधला.





जालना शहरातील ओळखल्या जाणाऱ्या मानाचा गणपती श्री नवयुवक गणेश मंडळ येथे श्रींची सकाळ ची महाआरती ,उद्योगपती गोपाल घनश्याम गोयल पत्नी शिखा गोपाल गोयल यांच्या शुभहस्ते तर संयकाळ ची महाआरती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि प्रसिद्ध राहुल तालुका पत्नी सारिका तालुका, तिशा तालुका युवान तालुका यांच्या हस्ते करण्यात आली यावेळी मंडळाच्या वतीने त्यांचे सत्कार करताना गणपती ट्रस्ट चे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र आबड सोबत मंडळ समिती, अध्यक्ष अल्केश अग्रवाल,महामंत्री दर्शीत आबड, उपाध्यक्ष धीरज धारीवाल, मयूर सावजी,जितेश तालुका,रमेश दलाल,संजय तालुका,अनुराग अग्रवाल, राधेश्याम अग्रवाल,श्याम मल्लावत सुनील अग्रवाल,श्रेणिक आबड , हितेंद्र आबड, संतोष अग्रवाल, आदी (छाया/जावेद तंबोली)



मानाचा गणपती श्री नवयुवक गणेश मंडळ कादराबाद जालना येथे सजीव देखाव्याचे उद्घाटन करताना उपविभागीय पोलीस अधिकारी आनंत कुलकर्णी गणपती ट्रस्टचे अध्यक्ष राजेंद्र आबड मंडळ समितीचे अध्यक्ष अलकेश अग्रवाल, महामंत्री दर्शीत आबड , अनुराग अग्रवाल, राहुल तालुका, श्रेणिक आबड, हितेंद्र आबड, रमेश दलाल, मयूर सावजी, जितेश तालुका, संजय तालुका, धीरज धारिवाल गणेश महाराज मांडे , आधी दिसत आहे(छाया/जावेद तंबोली)

## भारती कैलास झोरे यांचे निधन

**जालना - प्रतिनिधी**



शहरातील घायाळानगर येथील भारती झोरे (वय ४१) यांचे हृदयविकाराच्या झटक्याने सोमवारी दि. २१ सप्टेंबर रोजी सकाळी ८.४५ वाजता दुःखद निधन झाले आहे. त्याच्या पश्चात सासू, पती, एक मुलगा, मुलगी, दिर, भावजया असा मोठा परिवार आहे. माजी नगरसेवक कैलास झोरे यांच्या पत्नी होत्या. त्याच्यावर रामतीर्थ स्मशान भूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले आहे.

## जालना येथे तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन

मिटकॉन प्रशिक्षण केंद्र, जालना व उद्योग विकास विभाग आणि शासकीय औद्योगिक विकास महामंडळे यांच्या वतीने जालना येथे दि.२८ सप्टेंबर २०२६ पासुन एक महीना कालावधीत तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.

सदरील प्रशिक्षण कार्यक्रमात युवक व युवतींसाठी स्वतःचा उद्योग/व्यवसाय उभारणीसाठी व कर्ज प्रकरण करण्यासाठी हा प्रशिक्षण वर्ग अंत्यत महत्त्वाचा राहणार आहे. या प्रशिक्षण कार्यक्रमात सौर ऊर्जा (सोलर एनर्जी) , विद्युत वाहणे (इलेक्ट्रिकल व्हेअकल) व सायबर सुरक्षा व इतर अनेक उद्योगाबाबतीत थेरी व प्रात्येक्षिकासह मार्गदर्शन राहणार आहे. या प्रशिक्षणात मशिनरी हाताळणे, सोलर एनर्जी प्लेट तयार करणे, कच्चामाल, साहीत्य ,कॅपीसिटी, जोडणी व विक्रीव्यवस्था, बिघाड दुरुस्ती व उपलब्ध प्लॅन्ट या सोबत उद्योग संधी मार्गदर्शन, उद्योग प्रेरणा, संघटन कौशल्य, उद्योजकीय गुणसंपदा, व्यक्तीमत्व विकास, प्रभावी संभाषण कौशल्य, उद्योग व्यवस्थापन, जागेची निवड, बाजारपेठ पाहनीतंत्र, शासकीय व निमशासकीय योजना, जिल्हा उद्योग केंद्राच्या विविध योजना, खादीग्राम उद्योग मंडळाच्या योजना,



महामंडळाच्या विविध योजना, अनुदानाच्या योजना ,कृषी संलग्न योजना, राष्ट्रीय पशुधन योजना,प्रकल्प अहवाल तयार करणे, कर्ज प्रस्ताव तयार करणे, बँकेची कार्यप्रणाली , विक्री व्यवस्था, भांडवल उभारणी, मनुष्यबळ , विमा संरक्षण, शासकीय परवाने, प्रशिक्षण प्रमाणपत्र इत्यादी बाबतीत तज्ञ प्रशिक्षक, वरिष्ठ अधिकारी व यशस्वी उद्योजकांचे मार्गदर्शन लाभणार आहे.

अधिक माहिती व प्रवेश अर्जासाठी कांतिकराव दांडगे ,जिल्हा प्रकल्प अधिकारी, मिटकॉन द्वारा पत्रकार भवन, एस. पी. ऑफिस समोर , शासकीय ग्रंथालयाच्या बाजूला ,जालना.मो.९४२३७३०९३२ येथे दि.२८ सप्टेंबर २०२६ पर्यंत संपर्क साधावा असे आवाहन कांतिकराव दांडगे, मिटकॉन, जालना यांनी केले आहे.

## पुण्यात वीरशैव कक्कय्या समाजाचा भव्य वधू-वर मेळावा व गुणवंत सत्कार सोहळा

**दत्ता खंदारे - प्रतिनिधी**

वीरशैव कक्कय्या समाज विकास मंडळ, पुणे यांच्या वतीने रविवार दिनांक १५ नोव्हेंबर २०२६ रोजी गणेश कला क्रीडा मंच, स्वारगेट, पुणे येथे भव्य वधू-वर मेळावा, स्नेह संमेलन, गुणवंत विद्यार्थी सत्कार व विशेष प्राविण्य सत्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. या सोहळ्यात समाजातील ज्या विद्यार्थ्यांना इयत्ता १० वी मध्ये ९० टक्क्यांपेक्षा जास्त आणि इयत्ता १२ वी मध्ये ८० टक्क्यांपेक्षा जास्त गुण मिळाले आहेत, अशा गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच विशेष प्राविण्य प्राप्त करणाऱ्या, एनईईटी () मार्फत मेडिकलला आणि जेईई () मार्फत इंजिनिअरिंगला प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येणार आहे. सत्कारासाठी पात्र विद्यार्थ्यांनी आपली नावे, गुणपत्रिका व माहितीसह पुणे मंडळाकडे तसेच अध्यक्ष हनुमंत सोनवणे यांच्या ९७६९९५५७७५ या व्हॉट्सॲप क्रमांकावर लवकरात लवकर कळवावीत. सर्व समाज बांधव व भगिनींनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे.

## मातृतीर्थ सिंदखेड राजा येथील ऐतिहासिक गरुड मूर्ती महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभागाच्या स्वाधीन

**सिंदखेड राजा - प्रतिनिधी**

दि.  : मातृतीर्थ सिंदखेड राजा या ऐतिहासिक नगरीच्या वैभवशाली इतिहासात आणखी एका महत्त्वपूर्ण ऐतिहासिक ठेव्याची भर पडली आहे. येथील ऐतिहासिक गरुड मूर्तीचा शोध लागला असून, ही मूर्ती महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभागाच्या स्वाधीन करण्यात आली आहे.



सिंदखेड राजा नगरीला सातवाहन, चालुक्य, यादव तसेच शिवकालीन इतिहासाचा समृद्ध वारसा लाभलेला आहे. या ऐतिहासिक वारशातील अनेक वास्तू, शिल्पे व वस्तूंना विशेष ऐतिहासिक महत्त्व आहे. याच ऐतिहासिक वारशाचा एक भाग असलेल्या गरुड मूर्तीची नोंद इतिहास अभ्यासक *आर. सी. अग्रवाल यांनी सन १९८९ मध्ये आपल्या पीएच.डी. प्रबंधात तसेच पुस्तकात केली होती*. त्यांनी या मूर्तीचे छायाचित्रही प्रकाशित केले होते. मात्र, कालांतराने ही ऐतिहासिक मूर्ती लुप्त झाली होती.

सन २०२२ मध्ये स्थानिक इतिहास अभ्यासक व लेखक सुमित सुभाष खांदवे आणि मयुरेश अतुल खेकाळे यांनी या गरुड मूर्तीचा शोध घेण्याचा प्रयत्न सुरू केला. सिंदखेड राजा येथील ऐतिहासिक वारशाचा अभ्यास करत असताना त्यांनी या मूर्तीविषयी माहिती संकलित केली. त्यांच्या या संशोधनाचा आणि शोधकार्याचा उल्लेख त्यांनी प्रकाशित केलेल्या 'माहेर जिजाऊंचे सिंदखेड राजा' या पुस्तकातही केला आहे. दीर्घकाळाच्या प्रयत्नांनंतर ही ऐतिहासिक गरुड मूर्ती शोधण्यात त्यांना यश आले. ऐतिहासिक व पुरातत्त्वीय वारशाचे जतन व्हावे आणि हा ठेवा पुढील पिढ्यांसाठी सुरक्षित राहावा, या उद्देशाने संबंधितांनी ही मूर्ती महाराष्ट्र राज्य पुरातत्व विभागाच्या स्वाधीन केली.

पुरातत्व विभागाचे अधिकारी मयुरेश खडके आणि कर्मचारी धीरज हांडे यांनी तत्परता दाखवत सदर ऐतिहासिक मूर्ती विभागाच्या ताब्यात घेतली*.त्यामुळे सिंदखेड राजा येथील ऐतिहासिक वारशातील आणखी एका महत्त्वपूर्ण ठेव्याचे संरक्षण होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. या प्रसंगी समाजसेवक श्री अतुल खेकाळे, इतिहास अभ्यासक सुमित सुभाष खांदवे, पत्रकार रफिक सय्यद, पत्रकार विजय सोनुने, सामाजिक कार्यकर्ते डॉ.सुभाष खांदवे यांच्यासह नागरिक उपस्थित होते.सिंदखेड राजा येथील ऐतिहासिक वारसा जतन करण्याच्या दृष्टीने हा शोध महत्त्वपूर्ण मानला जात असून या मुर्ती च्या योग्य मूळ स्थाना बद्दल अभ्यास सुरू आहे अशी माहिती इतिहास अभ्यासक मयुरेश अतुल खेकाळे यांनी दिली, अशा ऐतिहासिक वस्तू व वास्तूंचे शास्त्रोक्त पद्धतीने संवर्धन करण्यासाठी स्थानिक इतिहास अभ्यासक, नागरिक आणि पुरातत्व विभाग यांच्यातील समन्वय महत्त्वाचा ठरणार आहे.

## बजरंग गणेश मंडळात भक्तीचा महासागर; सुवर्ण चरणांच्या दर्शनासाठी भाविकांची रीघ

### गोविंद गर्जना पथकाची थरारक मानवंदना ; उद्योगपती सतीश अग्रवाल व आदित्य अग्रवाल यांच्या हस्ते महाआरती

**जालना - प्रतिनिधी**

नवसाला पावणारा अशी ख्याती असलेल्या शहरातील मानाचा दुसरा गणपती, जेईएस कॉलेज रोडवरील श्री बजरंग गणेश मंडळात गणेशोत्सवाच्या सातव्या दिवशी भक्तीचा अभूतपूर्व उत्साह पाहायला मिळाला. बाप्पाच्या दर्शनासाठी जालना शहरासह संपूर्ण जिल्ह्यातून भाविकांचा जनसागर उसळला असून, दिवसभरात हजारो भाविकांनी बाप्पाच्या चरणी माथा टेकवला.



या महोत्सवाचे मुख्य आकर्षण ठरलेल्या बाप्पाच्या अलौकिक सुवर्ण चरण (सोन्याचे चरण) दर्शनासाठी सकाळपासूनच भाविकांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या. सुवर्ण चरणांचे दर्शन घेऊन भाविक अक्षरशः भारावून गेले.गणेशोत्सवाच्या सातव्या दिवशी सायंकाळी उद्योगपती सतीश अग्रवाल व आदित्य अग्रवाल यांच्याहस्ते बाप्पाची मंगलमय महाआरती संपन्न झाली. उभयतांचे मंडळाच्यावतीने स्वागत करण्यात आले. याप्रसंगी आरती सुरू असतानाच गोविंद गर्जना ढोल-ताशा पथकाने सादर केलेली मानवंदना अंगावर रोमांच उभी करणारी ठरली. ढोल-ताशांच्या कडकडाटाने आणि गणपती बाप्पा मोरयाच्या जयघोषाने संपूर्ण परिसर दुमदुमून गेला होता. भाविकांची गर्दी लक्षात घेता, बजरंग गणेश मंडळाच्यावतीने दर्शन रांगेचे चोख व्यवस्थापन करण्यात येत आहे. वृद्ध, महिला व लहान मुलांसाठी सुलभ दर्शन होईल अशी काटेकोर व्यवस्था मंडळाने उभारली असून, महाआरतीनंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात येत आहे.

# पांदण रस्ते, विहिरी, घरकुल कामांत अनियमिततेचा आरोप; चौकशीची मागणी

## कामे पूर्ण न करता बिले काढल्याचा दावा; लाभार्थ्यांकडून पैशांची मागणी केल्याचा युवासेनेचा आरोप

**मंठा - प्रतिनिधी**

मंठा पंचायत समितीअंतर्गत महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेसह विविध योजनांच्या माध्यमातून सुरू असलेल्या पांदण रस्ते, अहिल्यादेवी सिंचन विहिरी, जनावरांचे गोठे तसेच रमाई, प्रधानमंत्री आवास, यशवंतराव चव्हाण व शबरी आवास योजनेतील घरकुलांच्या कामांमध्ये अनियमितता होत असल्याचा आरोप युवासेनेचे उपजिल्हाप्रमुख योगेश ज्ञानेश्वर गगणे यांनी केला आहे. कामे पूर्ण न करता बनावट कागदपत्रे व छायाचित्रांच्या आधारे बिले काढण्यात येत असल्याचा दावा करीत त्यांनी मंठा तालुक्यातील या सर्व कामांची सखोल चौकशी करून दोषी अधिकारी व कर्मचाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

गगणे यांनी दिलेल्या निवेदनानुसार, पंचायत समितीअंतर्गत रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून पांदण रस्ते, अहिल्यादेवी सिंचन विहिरी, जनावरांचे गोठे तसेच विविध घरकुल योजनांची कामे सुरू आहेत. सिंचन विहिरींना प्रशासकीय मान्यता व कार्यारंभ आदेश मिळूनही अनेक शेतकऱ्यांना कामाची रक्कम मिळालेली नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. काही शेतकऱ्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना पैसे दिल्यानंतर काम न करता बिले काढण्यात आल्याचाही दावा निवेदनात करण्यात आला आहे.



विहिरीच्या कामांसाठी १५ ते २० हजारांची मागणी केल्याचा आरोप संबंधित यंत्रणेतील काही कर्मचाऱ्यांकडून प्रत्येक विहिरीच्या कामासाठी १५ ते २० हजार रुपये घेतल्यानंतर प्रशासकीय मान्यता देण्यात आल्याचा गंभीर आरोप निवेदनात करण्यात आला आहे. जनावरांच्या गोठ्याची कामे पूर्ण करून प्रस्ताव सादर केलेल्या काही लाभार्थ्यांनाही देयके मिळाली नसून, पैशांची मागणी पूर्ण न झाल्यामुळे बिले अडविण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे.

घरकुलाच्या बिलांसाठी २५ ते ३० हजारांची मागणी? घरकुलाच्या कामाबाबतही निवेदनात गंभीर आरोप करण्यात आले आहेत. घरकुल अभियंते प्रत्यक्ष बांधकामाची पाहणी करीत नसल्याचा आरोप करून, मंजूर रकमेत घराचा पाया देखील पूर्ण होत नसल्याचे सांगून लाभार्थ्यांकडून २५ ते ३० हजार रुपये घेतले जात असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यानंतर घरकुलाचे काम पूर्ण झाल्याचा अहवाल देऊन रक्कम काढण्याची पद्धत सुरू असल्याचे निवेदनात म्हटले आहे. तसेच काही खासगी व्यक्तींमार्फत एकाच कामाचे वेगवेगळ्या टप्प्यांतील छायाचित्रे काढून, त्यामध्ये बनावट छायाचित्रे जोडून लाभार्थ्यांकडून २५ ते ३० हजार रुपये वसूल करून घरकुलाची बिले काढली जात असल्याचा आरोपही करण्यात आला आहे.

चौकशी न झाल्यास आमरण उपोषणाचा इशारा या प्रकाराबाबत अनेक गावांतील लाभार्थी नाराजी व्यक्त करीत असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. संबंधित प्रकाराला काही अधिकारी व कर्मचारीही हातभार लावत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. त्यामुळे शासनाच्या निधीचा गैरवापर होत असल्याचे सांगत मंठा तालुक्यातील सर्व कामांची तात्काळ चौकशी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

यापूर्वी ३१ ऑगस्ट २०२६ रोजी मंठा पंचायत समितीच्या गटविकास अधिकाऱ्यांना अर्ज देण्यात आला होता, असेही निवेदनात नमूद आहे. या प्रकरणाची दखल घेऊन चौकशी व कारवाई न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयासमोर *(पान २ वर)*

# अवैध मुरुम वाहतूक करणारा टिप्पर व रेती उत्खनन करणारे जेसीबी जप्त

## जाफ्राबाद तालुक्यात महसूल प्रशासनाची कारवाई

**जालना - प्रतिनिधी**

जाफ्राबाद तालुक्यात सुरू असलेल्या अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीविरोधात महसूल प्रशासनाने कारवाई करत मौजे गोंधनखेडा येथून अवैध मुरूम वाहतूक करणारा एक टिप्पर, तसेच काळेगाव (बोबडेवाडी) येथून अवैध रेती उत्खननासाठी वापरण्यात येणारे एक जेसीबी मशीन जप्त करण्यात आले. जाफ्राबाद तालुक्यातील मौजे गोंधनखेडा परिसरात अवैधरीत्या मुरूम वाहतूक होत असल्याची माहिती मिळाल्यानंतर महसूल प्रशासनाच्या पथकाने कारवाई करत संबंधित एक टिप्पर जप्त केला. तसेच काळेगाव (बोबडेवाडी) परिसरात अवैधरीत्या रेती उत्खनन सुरू असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पथकाने तेथे कारवाई करून रेती उत्खननासाठी वापरण्यात येणारे एक जेसीबी मशीन ताब्यात घेतले.

पकडण्यात आलेली दोन्ही वाहने पुढील कायदेशीर कार्यवाहीसाठी पोलीस स्टेशन, टेम्भूर्णी यांच्या ताब्यात देण्यात आली आहेत. अवैध गौण खनिज उत्खनन व वाहतुकीला आळा घालण्यासाठी महसूल प्रशासनाकडून अशा प्रकारच्या कारवाया सुरूच राहणार असल्याचे सांगण्यात आले.

# आनंदगडावर ब्रह्मर्षी मतांग ऋषींच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा; क्रांतिवीर टंट्या मामा भिल्ल यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण

## राष्ट्रीय संत स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज व संत भगवान महाराज यांच्या पावन सानिध्यात भव्य सोहळा

**जालना । प्रतिनिधी**

जालना तालुक्यातील देऊळगाव राजा रोडवरील ऐतिहासिक आनंदगड येथे बुधवार, दि. २३ सप्टेंबर रोजी सकाळी ८.३० वाजता ब्रह्मर्षी मतांग ऋषी यांच्या मूर्तीची विधिवत प्राणप्रतिष्ठा तसेच क्रांतिवीर टंट्या मामा भिल्ल यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात येणार आहे. अयोध्या येथील श्रीराम जन्मभूमी तीर्थ क्षेत्र न्यासचे महामंत्री तथा राष्ट्रीय संत स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज यांच्या शुभहस्ते हा सोहळा पार पडणार असून आनंदगड संस्थानचे प.पू. संत श्री भगवान महाराज यांच्या पावन सानिध्यात हा धार्मिक व सामाजिक महत्त्वाचा कार्यक्रम होणार आहे. या सोहळ्यास ह.भ.प. किसन नामदेव लबडे, जालना येथील देवगिरी कल्याण आश्रमाचे कैलास बियाणी, डॉ. दीपक मंत्री, स्मिता भक्कड, नीरज शर्मा यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

**माता शबरी मंदिरात मतांग ऋषींची मूर्ती**

आनंदगड परिसरातील माता शबरी यांच्या पावन मंदिरात प्रभू श्रीराम, लक्ष्मण आणि माता शबरी यांच्या मूर्ती यापूर्वीच विराजमान आहेत. याच मंदिरात आता माता शबरी यांच्या गुरुवर्य ब्रह्मर्षी मतांग ऋषी यांच्या मूर्तीची विधिवत प्राणप्रतिष्ठा व स्थापना करण्यात येणार आहे.

भक्ती, त्याग, साधना आणि ज्ञानपरंपरेचे प्रतीक म्हणून मतांग ऋषींच्या मूर्तीची स्थापना करण्यात येत असल्याचे आयोजकांनी सांगितले. त्यामुळे आनंदगड परिसरातील धार्मिक व आध्यात्मिक वातावरणाला आणखी एक महत्त्वपूर्ण आयाम प्राप्त होणार आहे.

**टंट्या मामा भिल्ल यांच्या पुतळ्याचे अनावरण**

याच सोहळ्यात जनजातीय समाजाच्या शौर्य, स्वाभिमान आणि संघर्षाचे प्रतीक मानले जाणारे क्रांतिवीर टंट्या मामा भिल्ल यांच्या भव्य पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण करण्यात येणार आहे.

ब्रिटिश सत्तेविरुद्धच्या संघर्षात टंट्या मामा भिल्ल यांच्या योगदानाची आठवण जागविणारा हा पुतळा आनंदगड परिसरात उभारण्यात आला आहे. जनजातीय समाजाचा इतिहास, संस्कृती, परंपरा आणि राष्ट्रनिष्ठेची जाणीव नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याच्या उद्देशाने या पुतळ्याची उभारणी करण्यात आल्याचे आयोजकांनी सांगितले.

या पुतळ्याचे भूमीपूजन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत यांच्या हस्ते झाले होते. त्यानंतर प.पू. संत श्री भगवान महाराज आनंदगडकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुतळ्याच्या उभारणीचे काम पूर्ण करण्यात आले.

ब्रह्मर्षी मतांग ऋषींची मूर्ती आणि टंट्या मामा भिल्ल यांच्या पूर्णाकृती *(पान २ वर)*

# कडधान्य प्रक्रिया केंद्रासाठी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यातील शेतक-यांना कडधान्य विक्रीच्या मूल्यवर्धनास चालना देऊन शेतक-यांचे उत्पन्न वाढविणे या उद्देशाने काहीतरी पायाभूत सुविधा बळकट करण्यासाठी कडधान्य प्रक्रिया युनिट स्थापन करण्यास अर्ज दि. २८ जानेवारी २०२६ अखेरपर्यंत तालुका कृषी अधिकारी यांच्या मार्फत प्रस्ताव या कार्यालयास सादर करण्यात यावे, सदर योजनेअंतर्गत शेतकरी उत्पादक संस्था क्लस्टर स्तर महासंघ प्राथमिक कृषी पतसंस्था उद्योजक तसेच प्रक्रिया युनिट स्थापन करण्यास इच्छुक इतर पात्र व्यक्ती/संस्था यांना सहाय्य देऊन कडधान्य मूल्यसाखळी अधिक कार्यक्षम व सक्षम करणे हा मुख्य उद्देश आहे.

पात्र लाभार्थी घटक- योजनेअंतर्गत खालील घटकांना आर्थिक सहाय्य देण्यात येईल;शेतकरी उत्पादक संस्था क्लस्टर स्तर महासंघ प्राथमिक कृषी पतसंस्था वैयक्तिक कोणत्याही अधिनियमांर्तगत नोंदणीकृत इतर उपक्रम पात्रता निकष : गट लाभार्थी संबंधित संस्था किमान मागील दोन वर्षापासून विधिवत नोंदणीकृत व कार्यरत असावी.

प्रकल्प खर्चाच्या किमान १५% रक्कम तसेच कार्यभांडवलासाठी आवश्यक मार्जिन मनी स्वतः उभारण्याची आर्थिक क्षमता असावी.

# राधेकृष्ण महिला महाविद्यालयात क्रीडा महोत्सव मोठ्या उत्साहात साजरा




**परतूर - प्रतिनिध**

परतूर येथे राधेकृष्ण महिला महाविद्यालयात क्रीडा महोत्सव आयोजित करण्यात आला होता. ह्या एक दिवसीय कार्यक्रमात रांगोळी , चित्रकला, पोस्टर किंग, आणि निबंध स्पर्धा घेण्यात आली होती.या महोत्सवात सहभागी झालेल्या सर्व विद्यार्थीनीने चांगला प्रतिसाद दिला होता.या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे तथा संस्थेच्या सचिव, राजपूत मॅडम, होत्या व संस्था अध्यक्ष, कुणाल राजपूत. यांची उपस्थिती प्रार्थनीय होती. यावेळी शिक्षक प्राचार्य, डॉ. खरात सर. प्राचार्य, वटाणे सर. माने सर. राऊत सर. खतीब सर. मगर सर. चंदणे मॅडम. व विद्यार्थीनी यांची उपस्थिती होती.

# सत्तेच्या आसनावर सज्जन व्यक्तीला बसण्याचे कार्य संतांनी करावे-स्वामी गोविंददेवगिरीजी

**जालना - प्रतिनिधी**

सत्तेच्या आसनावर सज्जन व्यक्तीला प्रतिष्ठित करणे आणि समाजाला त्रास देणाऱ्या दुर्जन सत्ताधाऱ्याला दूर करणे हे संतांचे कार्य आहे. संत केवळ अध्यात्माची शिकवण देत नाहीत, तर समाजजीवनाला योग्य दिशा देण्याचे कामही करतात. सत्ता ही समाजकल्याणासाठी असावी, अन्याय आणि अधर्मासाठी नव्हे, असा मौलिक उपदेश श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र न्यासचे महामंत्री तथा श्रीकृष्ण जन्मभूमी न्यास, मथुराचे उपाध्यक्ष प. पू. राष्ट्रीय संत गुरुदेव स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज यांनी येथे बोलताना दिला.

भक्ती ज्ञानगंगा श्रीमद् भागवत कथा समिती आणि सकल हिंदू समाजाच्यावतीने मंठा रोडवरील आईसाहेब लॉन्स येथे आयोजित श्रीमद्□ भागवत कथेचे आज मंगळवार दिनांक २३ सप्टेंबर रोजी तिसरे पुष्प गुंफतांना स्वामी गोविंददेवगिरीजी महाराज यांनी मानवी जीवनात अध्यात्म, सदाचार आणि नीतिमत्तेच्या महत्त्वावर भर दिला.



जीवन समृद्ध करण्यासाठी संतांचे विचार आणि प्राचीन संस्कृतीचे संस्कार अंगीकारणे ही काळाची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रारंभी कथेचे मुख्य यजमान विष्णूकुमार चेचानी, दैनिक यजमान अरुण अग्रवाल, प्रसाद यजमान पुरुषोत्तम तोष्णीवाल यांच्याहस्ते पूजन करण्यात आले. दरम्यान, आजच्या कथेला जिल्हाधिकारी असीमा मित्तल यांनी उपस्थित राहून महाराजांचे आशीर्वाद घेतले.

महाराज पुढे म्हणाले की, मनुष्याने आपल्या शरीरासाठी आयुष्यभर अनेक गोष्टी केल्या. शरीराला सुख-सुविधा मिळाव्यात, त्याचे आरोग्य चांगले राहावे, त्याला ऐश्वर्य मिळावे यासाठी आपण सतत धडपडत राहतो; मात्र या जड शरीरामध्ये असलेल्या चैतन्याचा, आत्म्याचा आणि अंतर्मनाचा विकास करण्यासाठी आपण काय केले, याचा विचार प्रत्येकाने केला पाहिजे. बाह्य जीवन समृद्ध करण्याबरोबरच अंतःकरण समृद्ध करणेही तितकेच आवश्यक आहे.जीवनात महान व्हायचे असेल तर सर्वप्रथम स्वतःच्या शब्दांचा आणि स्वतःच्या विचारांचा आदर करायला शिका, असे सांगताना महाराजांनी आत्मविश्वास आणि आत्मशिस्तीचे महत्त्व अधोरेखित केले. आपण स्वतःशी केलेली वचने पाळली, स्वतःच्या मूल्यांशी प्रामाणिक राहिलो आणि आपल्या विचारांना आचरणाची जोड दिली, तरच व्यक्तिमत्त्व महान घडते. मनुष्याच्या आध्यात्मिक प्रगतीच्या मार्गातील तीन मोठे अडथळे म्हणजे कामिनी, कांचन आणि कीर्ती. विषयवासना, धनाची आसक्ती आणि प्रसिद्धीची लालसा यामध्ये मनुष्य गुंतला की त्याची तपश्चर्या, साधना आणि आत्मचिंतन मागे पडते. त्यामुळे जीवनात पैसा, प्रतिष्ठा आणि लौकिक यांचा उपयोग असला तरी त्यांच्याशी आसक्त होणे टाळले पाहिजे.

कार्य करणे चुकीचे नाही; पण केवळ संसाराचेच कार्य करत राहणे चुकीचे आहे. कुटुंब, व्यवसाय, समाज आणि प्रपंचाची कर्तव्ये नक्कीच पार पाडावीत; मात्र संपूर्ण आयुष्य केवळ भौतिक गरजा पूर्ण करण्यात खर्ची घालू नये. शरीरासाठी *(पान २ वर)*

# जुना जालन्यात दुमदुमला गौसन्मान जागर!

## गोमातेला राज्यमातेनंतर आता राष्ट्रमाता दर्जासाठी लढा-अभिमन्यू खोतकर

**जालना - प्रतिनिधी**

गोमातेला राष्ट्रमातेचा सन्मान मिळावा, देशभरात गोहत्या पूर्णतः प्रतिबंधित करून गोमातेला संरक्षण मिळावे, तसेच संपूर्ण भारतात समान गोसेवा घडावी यासाठी स्वतंत्र केंद्रीय गोसेवा मंत्रालयाची स्थापना करून केंद्रीय कायदा लागू करण्यात यावा, या मागण्यांसाठी श्री गणेश महासंघ, अद्विक क्लब, रोटरी क्लब ऑफ जालना इलाईट आणि इनरव्हील क्लब ऑफ जालना यांच्या संयुक्त विद्यमाने सोमवार दि. २१ सप्टेंबर रोजी सायंकाळी शिवसेनेचे युवा नेते



अभिमन्यू खोतकर यांच्या प्रमुख उपस्थितीत भव्य गौसन्मान जनजागृती रॅली काढण्यात आली.

मस्तगड येथील श्री मंमादेवी माता गणेश मित्र मंडळात आरती आणि मंमादेवीमातेचे दर्शन करून अभिमन्यू खोतकर यांच्या हस्ते आणि शिवसेनेचे महापालिकेतील विरोधी पक्षनेते कमलेश खरे, नगरसेवक दुर्गेश कटोटीवाले प्रमुख उपस्थितीत रॅलीचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी श्री गणेश महासंघाचे अध्यक्ष श्लोक अग्रवाल, महासचिव भूषण यादव, कार्याध्यक्ष अॅड. महेश धन्नावत, उपाध्यक्ष डॉ. शिवदत्त विजयसेनानी, आनंद बंब, गौरव बोरा, माजी अध्यक्ष रोहित भुरेवाल, मार्गदर्शक बाबा नंद, उद्योजक सागर मित्तल, युवा उद्योजक अर्जुन पित्ती, अमोल बांगड यांच्यासह अद्विक क्लब, रोटरी क्लब ऑफ जालना इलाईट, इनरव्हील क्लब ऑफ जालनाचे पदाधिकारी आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. गौसन्मान स्वाक्षरी अभियानाला अधिक *(पान २ वर)*

# अपर जिल्हादंडाधिकारी यांचे कलम ३७ (१) व (३) अन्वये आदेश जारी

**जालना - प्रतिनिधी**

जिल्ह्यात दि. २५ सप्टेंबर २०२६ रोजी श्रीगणेश विर्सजन/अनंत चतुर्दशी, दि. २९ सप्टेंबर २०२६ रोजी अंगारक संकष्ट चतुर्थी, दि. २ ऑक्टोबर २०२६ रोजी राष्ट्रपिता महात्मागांधी जयंती तसेच लाल बहादूर शास्त्री जयंती, सण, उत्सव साजरे करण्यात येणार आहे. या सण, उत्सव, जयंतीच्या अनुषंगाने जिल्ह्यात व शहरात मिरवणुका व विविध कार्यक्रम आयोजित होतात. त्यासाठी मोठ्या प्रमाणावर नागरिक एकत्र येत असतात. तसेच जिल्ह्यामध्ये विविध समाजांच्या आरक्षणाच्या मागण्यांच्या तसेच आरक्षण बचावाच्या अनुषंगाने तसेच शेतकऱ्यांचे विविध मागण्यासाठी उपोषणे, आंदालने, मोर्चे, धरणे इत्यादी आंदोलनात्मक कार्यक्रम सुरु आहेत. या मागण्यांच्या अनुषंगाने भविष्यातही विविध स्वरुपाची आंदोलने, मोर्चे, निदर्शने, रास्तारोको इत्यादी कार्यक्रम आयोजित होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे काही अनुचित प्रकार घडुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

त्यामुळे अपर जिल्हादंडाधिकारी जालना यांना प्राप्त अधिकारानुसार पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३७ (१) अन्वये शासकीय कर्तव्य पार पाडणा-या कर्मचा-यांच्या व्यतिरिक्त इतर कोणतीही व्यक्ती सार्वजनिक ठिकाणी किंवा त्या आसपास शस्त्रे, लाठ्या, सोटे, बंदुके, तलवारी , भाले, चाकु व इतर शरीरास इजा अथवा अपाय करणा-या वस्तु जवळ बाळगणार नाही. तीक्ष्ण पदार्थ अथवा स्फोटके सहज हाताळता येतील अशी घातक वस्तु जवळ बाळगणार नाही. दगड किंवा इतर उपकरणे किंवा प्रवर्तक शस्त्रे गोळा करुन ठेवणार नाही किंवा जवळ बाळगणार नाही. व्यक्तींच्या किंवा समुहाच्या भावना जाणुनबुजुन दुखविण्याचे उद्देशाने असभ्यतेने भाषण म्हणणार नाही, वाद्य वाजविणार नाही, गाणे म्हणणार नाही. व्यक्तींचे किंवा शवाचे किंवा त्याच्या प्रतिकृतीचे प्रदर्शन करणार नाही. आवेषी भाषण, अंगविक्षेप,विडंबनापर नकला करणार नाही आणि सभ्यता किंवा नितिमत्ता यास बाधा येईल किंवा *(पान २ वर)*

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.